# प्रेसनोट

दिनांक– २०/०३/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | विजय सुखदेवराव चव्हाण, पो.ना. ब.नं. १२६, तत्कालिन नेमणुक पो. स्टे उरळ ता. बाळापूर जि. अकोला |
| ३ | पडताळणी तारीख | दिनांक ०८/१२/२०१९ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २०,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | तक्रारदारावर संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. |
| ६ | घटनास्थळ | कारंजा रमजानपूर मुख्य रस्त्यालगतचे शेतशिवार |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक ०४/१२/२०१९ रोजी अवैधरित्या रेती वाहतुकीचा व्यवसाय चालु ठेवण्याकरीता श्री संजय नामदेवराव कुंभार, पोहेकॉ. ब.नं. ३११ व श्री विजय सुखदेवराव चव्हाण, पो.ना. ब.नं. १२६, दोन्ही तत्कालिन नेमणुक पो.स्टे उरळ ता. बाळापूर जि. अकोला हे दरमहा रू.२०,०००/– हप्त्याप्रमाणे लाच मागणी करीत असल्याबाबतची तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे दिली होती.

श्री ईश्वर चव्हाण, तत्कालिन पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. अकोला यांनी दि.०८/१२/२०१९ रोजी १०.२० वा ते ११.२० वा चे सुमारास केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान कारंजा रमजानपूर गावाचे जवळ पो.ना. विजय चव्हाण, तत्कालिन नेमणुक पोस्टे उरळ यांची भेट झाली. त्यावेळी पो.ना. विजय चव्हाण यांनी तक्रारदारास अवैधरित्या रेती वाहतुकीचा व्यवसाय चालु ठेवण्याकरीता रू. २०,०००/– च्या लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दिनांक १२/१२/२०१९ रोजी आजमाविण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान पो.ना. विजय चव्हाण यांना संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. मा. उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती यांचेकडुन प्राप्त स्पेक्ट्रोग्राफीक तपासणी अहवालानंतर फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक विजय सुखदेवराव चव्हाण, पो.ना. ब.नं. १२६ तत्कालिन नेमणूक पोस्टे उरळ यांचेविरूध्द पोलीस स्टेशन उरळ, जि. अकोला येथे अप.क. ९१/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारूती जगताप, पोलीस अधीक्षक अॅ.क.ब्युरो अमरावती, श्री. सच्छिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक अॅ.क.ब्युरो अमरावती व श्री. मिलींदकुमार अ. बहाकर पोलीस उपअधीक्षक अॅ.क.ब्युरो अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सचिन सावंत यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

मोबाईल क्र. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर पोलीस उपअधीक्षक–९१५८८२२६७६

श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०

टोल फ्रि क्रं. १०६४